पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक २१

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ७/८/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ५४१**

मा.शिवराम मेंगडे यांचे दि. ३०/७/२००७ चे पत्र.

सर्व्हे नं. ५४ कर्वेनगर, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था ते शाहू कॉलनी गल्ली क्र. ११ हा रस्ता कलम २१० अन्वये ५० फूट आखण्यात यावा.

**विषय क्र. ५४२**

मा.ज्ञानेश्वर शिंदे व मा.प्रकाश गलांडे यांचे दि. ३१/७/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२ व १३ मधील बीशप स्कूल ते सनसिटी या रस्त्यावर पुर्वीपेक्षा ६०% रहदारी वाढलेली आहे. सदर रस्ता अरुंद असल्याने येथील नागरिकांचे फार हाल होत आहेत.

तरी सदर रस्त्याच्या कडेला असणारी ट्रस्टची जागा त्वरीत ताब्यात घेऊन सदर रस्ता रुंद करण्यात यावा.

**विषय क्र. ५४३**

मा.विजय मारटकर, मा.सुनिल बनकर व मा.शंकरराव बेलदरे(पाटील) यांचे दि. २/८/२००७ चे पत्र.

पुणे पेठ कोंढवा खु.(उर्वरित) भाग पुणे मनपा हद्दीत १९९७ साली समाविष्ठ झाला आहे. पुर्वी ग्रामपंचायत असताना रस्ते झाले आहेत ते अस्तित्वातील रस्त्याची रुंदी ६ मी.वाढवूनही कमी आहे. वाढते नागरिकीकरण होत असल्यामुळे अस्तित्वातील रस्ते वाहतुकीसाठी कमी पडत आहेत. कोंढवा खु.(उर्वरित) स.नं. ४० चे पश्चिम हद्दीवरुन स.नं. ४६ व ४० मधुन प्रस्तावित १२ मी.रुंदीच्या आर.पी.रस्त्याची आखणी कोंढवा सासवड रस्त्यापासून कोंढवा व बिबवेवाडीच्या शिवेवरील रस्त्यापर्यंत आहे. या प्रस्तावित आर.पी.रस्त्यास जोड रस्ते स.नं. ४६, ६२ मध्ये जात आहे व त्याची रुंदी ६ मी.आहे. वाहतुकीचे दृष्टीने सदर अस्तित्वातील ६ मी.रस्त्याची रुंदी वाढविल्यास स.नं. ४६, ६२, ४७, ४८ मधील नागरी वस्तीस उपयोग होऊन वाहतुकीमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.

सबब कोंढवा खु.स.नं. ४६ व ६२ मधील अस्तित्वातील रस्त्याची रुंदी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २१०(१) नुसार वाढवुन ती ९ मी.ची करण्यात येऊन त्याप्रमाणे जागेचे भूसंपादन करुन रस्ता तयार करण्यात यावा.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्रं. ५४४**

दि. १६/७/२००७ ते दि. २२/७/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/२९९ दि. १/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## हिशेब तपासणी अहवाल

**विषय क्र. ५४५**

मा.विकास अभियंता(पाणीपुरवठा) कार्यालयाकडील कागदपत्राच्या तपासणीबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं. मुलेप/९५५ दि. ६/७/२००५ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १२६ सन २००४-०५ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्रं. मआ/मुले/२८२ दि. २७/७/२००७ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता - (ब).

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. ५४६**

आंबील ओढा, महर्षिनाला, बहिरोबा नाला व त्यांचे पाणलोट क्षेत्रातील सर्व नाले, अर्धगोलाकार पाईपने नाला चॅनेलायझेशन व कंपाऊंड वॉल/रिटेनिंग वॉल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.खिलारी एस.एस. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १२,९३,०४,०००/- पेक्षा २३% जास्त) (फेर ऑफर) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १५,९०,४३,९२०/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/२८५ दि. ३०/७/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ५४७**

टिळक रोड क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील प्रमुख चौकात मास्टीक अस्फाल्ट करणे भाग-२ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.नंदकुमार कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २६,४३,५२५/- पेक्षा ५.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २६,४३,५२५/- पर्यंत काम टेंडरमधील डांबर, सिमेंट आणि स्टील या बाबींच्या भाववाढ सूत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/२८६ दि. ३०/७/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ५४८**

विमाननगर ई.एस.आर.साठी पंपिंग मशिन पुरविणे, बसविणे व यशस्वीरित्या कार्यान्वित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.अलाईड इलेक्ट्रो.मेक प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३९,१०,९१०/- पेक्षा ३४% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ५२,४०,६१९=४०/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/प्र/२८७ दि. ३०/७/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ५४९**

प्रभाग क्र. १९ वडगाव बु. इंडियन ह्युम पाईप कंपनीपर्यंतचा ३० मी.प्रस्तावित डी.पी.रस्त्यापैकी १२ मी.रुंदीचा रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.अक्षय डेव्हलपर्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९८,१८०/- पेक्षा ॲटपार दराने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४९,९८,१८०/- पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/२८८ दि. ३०/७/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ५५०**

पथ विभागासाठी खडी पुरविणे (सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी पहिले चारही ठेकेदार मे.त्रिमूर्ती स्टोन मेटल कंपनी, मे.अमृत स्टोन कंपनी, मे.कृष्णा स्टोन इंडस्ट्रीज व मे.एन.व्हि.गर्दे यांनी (टेंडर र.रु. ८,३६,०००/- पेक्षा तडजोडीने ३५% जास्त दराने) काम करण्याची तयारी दर्शविल्याने ठेकेदार मे.त्रिमूर्ती स्टोन मेटल कंपनी, मे.अमृत स्टोन कंपनी, मे.कृष्णा स्टोन इंडस्ट्रीज व मे.एन.व्हि.गर्दे यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार र.रुपये ११,२८,६००/- पर्यंत काम प्रत्येकी र.रुपये २,८२,१५०/- चे करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/२८९ दि. ३०/७/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ५५१**

पाषाण गरवारे चौक ते नॅशनल हायवे सुतारवाडी रस्ता रुंद करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.डी.एस.मांजरेकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३४,८५,७००/- पेक्षा १८.२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २८,५१,३०२=६० अधिक टेंडरमधील डांबर, सिमेंट व लोखंड मधील दरवाढीचे सूत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/२९० दि. ३०/७/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ५५२**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्पातील झोन क्र. ४ मधील हांडेवाडी नाल्यातून मुख्य नलवाहिनी टाकणे भाग-२ (सन २००६-०७) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडसपैकी ठेकेदार मे.मनोज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,६१९=३२ पेक्षा २६.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,७३,७१९=४४ अधिक भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/२९१ दि. ३०/७/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ५५३**

कै.राजीव गांधी हॉस्पिटल (पेस्तनजी हॉस्पिटल) येथे फायर फायटींगची व विविध संकिर्ण कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.कृष्णा कन्स्ट्रक्शन्स् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,३८,४३७=१० पेक्षा ॲटपार दराने) (नव्याने कमी केलेले दर) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,३८,४३७=१० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/२९८ दि. १/८/२००७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ५५४**

पुणे मनपा परिवहन उपक्रमाच्या सेवकांना महागाई भत्ता फरक देणेसाठी रुपये ३ कोटी तसेच इतर तातडीच्या खर्चासाठी र.रुपये २ कोटी असे एकूण र.रुपये ५ कोटी पैकी र.रुपये २ कोटीचे अर्थसहाय्य उचल अथवा अनुदान स्वरुपात देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/२६६ दि. १८/७/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. ५५५**

प्रभाग क्र. २० सर्व्हे नं. ११/१५ कर्वेनगर नदीकाठपर्यंत असलेला नाला चॅनेलायझेशन करणे व रिटेनिंग वॉल बांधणे हे काम ठेकेदार मे.रेणुका एंटरप्राईजेस यांचेकडून पूर्वगणनपत्रक (उपलब्ध) र.रुपये २४,९९,७२०/- पर्यंत करुन घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/मलनि/२८४ दि. ३०/७/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ५५६**

आरोग्य खात्याकडील न्युअसन्स डिटेक्शन विभागाकडील न्युअसन्स डिटेक्टर पदाच्या रिक्त जागांवर नेमणूक करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. अतिमआ(ज)/एचओ/२९५ दि. ३१/७/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ५५७**

पुणे महानगरपालिकेच्या सांस्कृतिक सल्लागारपदी नेमणुकीबाबत झालेला पक्षनेते सभेचा दि. १९/७/२००७ चा निर्णय विचारासाठी.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक २२

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. १४/८/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ५५८**

मा.विष्णू हरिहर व मा.शांतीलाल मिसाळ यांचे दि. २७/६/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ८५ लिंगायत स्मशानभुमी येथे विविध कामे करणे र.रुपये ३ लाख तसेच वॉर्ड क्र. ८५ मधील वीर लहूजी वस्ताद तालीमजवळील नाल्यावर स्लॅब टाकून पूल रुंद करणे र.रुपये १३ लाख असे एकूण १६ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी ग-६, पान क्र. १३३, अ.क्र. १८६, लिंगायत स्मशानभूमी येथे जुने शौचालय पाडून नविन बांधणे | १६ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ८५ मधील वीर लहूजी वस्ताद तालीमजवळील नाल्यावर स्लॅब टाकून पूल रुंद करणे | --- | १३ लाख |
| २) वॉर्ड क्र. ८५ लिंगायत स्मशानभुमी येथे विविध कामे करणे | --- | ३ लाख |

**विषय क्र. ५५९**

मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी, मा.ज्ञानेश्वर शिंदे, मा.सुनिल टिंगरे, मा.चेतन तुपे, मा.प्रकाश गलांडे यांचे दि. ३/८/२००७ चे पत्र.

पुणे शहराची झपाट्याने वाढ होत आहे. वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. पण सध्याच्या परिस्थितीत येरवडा, टिंगरेनगर, भैरवनगर, लोहगांव, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, नगररोड, विमाननगर, वडगांवशेरी, खराडी, वाघोलीपर्यंत सर्वच भागात पाणी पुरवठा अत्यंत अनियमित व कमी दाबाने होतो. जुलै २००७ नगररोडच्या सर्व नगरसेवक व नागरिकांनी पाण्यासाठी विकफिल्ड कंपनीसमोर पाण्यासाठी नगर रोड बंद केला होता. इतकी पाण्याची बिकट परिस्थिती आहे.

तरी तुळापूर बंधाऱ्यातून पाणी उचलून वाघोली डोंगरात उंचावर नविन जलशुध्दीकरण केंद्र उभारावे व तेथून लोहगांव, टिंगरेनगर, वडगांवशेरी, खराडी, विमाननगर, खुळेवाडी, वाघोली व आजुबाजुच्या परिसराला पाणी पुरवठा करण्यासाठी गरजेप्रमाणे पाण्याची लाईन टाकाव्यात. त्यासाठी सन २००८-०९ चे बजेटमध्ये आवश्यक ती तरतुद करण्यात यावी.

**विषय क्र. ५६०**

मा.शंकरराव बेलदरेपाटील व मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. ३/८/२००७ चे पत्र.

पुणे-सातारा हायवे रोडशेजारील संतोषनगर, कात्रज येथे राज टॉवर्स सोसायटीचा ॲमेनिटीज स्पेस म्हणून सोडण्यात आलेल्या रिकाम्या जागेवर भाजी मंडई तयार करण्यात यावी.

**विषय क्र. ५६१**

मा.प्रमोद भानगिरे व मा.विजय देशमुख यांचे दि. ६/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ९६ महंमदवाडी येथे समाजमंदिर बांधणेकरीता र.रुपये ५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-१२, शहरात विविध ठिकाणी व्यायामशाळा बांधणे, पान क्र. २७९, अ.क्र. १३, | | |
| १) वॉर्ड क्र. ९६ व्यायामशाळेसाठी साहित्य खरेदी करणे | २ लाख | --- |
| २) यादी क्र. एस-१६, पान क्र. २७७, अ.क्र. १९, शहरात विविध ठिकाणी समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका बांधणे | ३ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ९६ महंमदवाडी येथे समाजमंदिर बांधणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ५६२**

मा.शंकरराव बेलदरेपाटील व मा.संदिप लडकत यांचे दि. ६/८/२००७ चे पत्र.

दत्तनगर, आंबेगाव पुणे मनपाच्या हद्दीवर दत्तनगर येथे स्मशानभुमी आहे. त्या स्मशानभूमीचा वापर दत्तनगर, आंबेगाव या भागातील मयतांच्या अत्यंविधीसाठी वापर केला जातो. परंतु त्याठिकाणी सुविधा नसल्याने नागरिकांची खुप गैरसोय होत असते. तरी वरील ठिकाणच्या स्मशानभूमीच्या विविध कामांसाठी पुणे मनपाच्या वतीने खर्च करण्यात यावा.

**विषय क्र. ५६३**

मा.अशोक उर्फ विष्णू हरणावळ व मा.सुरेखा उर्फ लिना पानसरे यांचे दि. ६/८/२००७ चे पत्र.

कै.नारायण देवचंद भामरे व्यायामशाळा व सांस्कृतिक भवन दुमजली करणेकरीता र.रुपये ५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-११, शहरात विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे व भुमिगत केबल टाकणे, पान क्र. ३०३, अ.क्र. १४३, वॉर्ड क्र. १०० पर्वती दर्शन येथे विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| कै.नारायण देवचंद भामरे व्यायामशाळा व सांस्कृतिक भवन दुमजली करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ५६४**

मा.सौ.रेखा टिंगरे व मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि. ८/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १ धानोरी येथील स.नं. १८,१९,८१,८२,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,४८, ४९,९०,९१,५१,५२,६७ येथील विविध गल्ल्यांमधील रस्ते डांबरीकरण करणेसाठी र.रुपये ४५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. ए-२, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरीकरण करणे, पान क्र. २३८, अ.क्र. २१, विश्रांतवाडी धानोरी रस्त्यावरील बॉक्स कल्व्हर्ट बांधणे व रस्ता करणे | ४५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| स.नं.१८,१९,८१,८२,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,४८,४९,९०,९१, ५१,५२,६७ येथील विविध गल्ल्यांमधील रस्ते डांबरीकरण करणे | --- | ४५ लाख |

**विषय क्र. ५६५**

मा.बापूसाहेब कर्णे गुरुजी व मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. ८/८/२००७ चे पत्र.

वॉर्डस्तरीय रकमेतून २ लाखापर्यंतच कामे करण्याची असणारी तरतुद महागाईने कालबाह्य झालेली आहे. अनेक छोटी छोटी विकास कामेही २ लाखात होत नाहीत. तरी वॉर्डस्तरीय रकमेतुन ५ लाखापर्यंत कामे करण्यात यावी.

**विषय क्र. ५६६**

मा.चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, मा.श्रीकांत पुजारी व मा.सौ.दिपाली ओसवाल यांचे दि. ८/८/२००७ चे पत्र.

नवक्षितीज ही संस्था कौल बिल्डींग नानकनगर, शंकरशेठ रोड, पुणे ४२ येथे गेली ४ वर्षे प्रौढ मतिमंदांकरीता काम करणारी रजिस्टर्ड संस्था असून या संस्थेमार्फत अनेक मतिमंदांचे पुनर्वसन व व्यवसायिक शिक्षण दिले जाते. दिवसेंदिवस यासाठी लागणारा खर्च वाढत आहे. या संस्थेचे कार्य विचारात घेता संस्थेला खास बाब म्हणून र.रुपये ५०,०००/- ची देणगी देण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ५६७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २४/३/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २१/७/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१२६ दि. २/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ५६८**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ३१/३/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २८/७/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१३० दि. ६/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ५६९**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/१३२ दि. ८/८/२००७ चे पत्र.

## एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्रं. ५७०**

पुणे महानगरपालिकेच्या मोटारींना लागणारे इंधन खरेदीपोटी टेंडर्स मागविली असता मे.हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून डिझेल रुपये ३५,१७८=७८ प्रति किलो लिटर आणि पेट्रोल रुपये ४८,३६४=८० प्रति किलो लिटर या दराने अथवा प्रचलित दराने त्यांचे दरपत्रकातील सर्व अटी स्वीकारुन आवश्यकतेनुसार एकूण र.रुपये १२,००,००,०००/- पर्यंत खरेदी पोटी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(तां)/व्हेईकल डेपो/३०२ दि. ७/८/२००७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ५७१**

पुणे, पेठ भवानी, 'भवानी माता मंदिर रस्ता' जुना मोटार स्टॅण्ड ते कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत रुंद करणेबाबत रस्त्याची भूसंपादनाची कार्यवाही मा.भुमि संपादन विशेष अधिकारी क्र. १५ यांचेमार्फत सुरु असून प्रकरण प्राथमिक अवस्थेत असल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूसं)/२६४ दि. १७/७/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ३१/७/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५७२**

पुणे शहराच्या परिसरातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एम.एस.आर.डी.सी.) ने केलेल्या कामाच्या रकमेची थकबाकी देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/वानि/१८८ दि. १६/६/२००७ चे पत्र.

१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एम.एस.आर.डी.सी.) केलेल्या पुणे परिसरातील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प कामाअंतर्गत प्रतिवर्षी टोल नाक्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाऐवजी प्रतिवर्षी पुणे मनपाने र.रु. १० कोटी इतकी रक्कम तूर्त वर्गीकरण करुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास (एम.एस.आर.डी.सी.) देणेस

२) पुणे मनपास अंदाजपत्रकात एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प कामासाठी तरतूद उपलब्ध करणेस

३) अंदाजपत्रकात तरतूद नसल्याने याबाबतचे वर्गीकरणाचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना देणेस.

(सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ३१/७/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५७३**

पुणे शहर व परिसर व तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका व परिसर यांच्या सभोवताली आखण्यात आलेल्या ९० मी.रुंद रस्त्यापैकी पुणे महानगरपालिका व लगतच्या परिसरातील रस्त्याअंतर्गत जागेचे भूसंपादन पुणे महानगरपालिकेच्या खर्चाने सुरु करण्यास स्थायी समितीमार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/२६१ दि. १७/७/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ३१/७/२००७ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ५७४**

पुणे मनपाच्या ५७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित क्रिकेट सामान्यांकरीता बूट जोड खरेदीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(वि)/स्टेडियम/३०१ दि. ७/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ५७५**

मा.उपमहापौर, मा.विरोधी पक्षनेते, मा.सभागृह नेते यांचे कार्यालयात चहापान मागविण्यात आला असून संबंधितांस त्याची बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ३०६५ दि. ९/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ५७६**

सन १९८७ साली शासनाने मंजूर केलेल्या पुणे शहराच्या जुन्या हद्दीच्या विकास आराखड्याच्या एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम ३८ नुसार करावयाच्या पुनरावलोकन कार्यवाहीच्या अनुषंगाने विद्यमान जमिन वापराचे नकाशे तयार करणे व त्याचा अहवाल तयार करणे या कामासाठी विशेष कार्याधिकारी (ओएसडी) म्हणून श्री.रामचंद्र गोहाड यांची नेमणूक करुन त्यांना दरमहा र.रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) मानधन देणेबाबत व त्यानुसार त्यांच्याबरोबर सहा महिन्यांकरीता करार करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/३०४ दि. ९/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ५७७**

भारताच्या स्वातंत्र्याच्या हिरक महोत्सवानिमित्त तसेच भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल पुणे महानगरपालिकेच्या वतीने गणेश कला क्रीडा केंद्र,स्वारगेट,पुणे येथे पुणेकरांसाठी ''आजादि के साठ साल '' हा कार्यक्रम स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच दि.१४ ऑगस्ट २००७ रोजी आयोजित करण्यांत आलेला आहे.या कार्यक्रमाचे मानधन रु.५ लाख अशोक हांडे यांच्या चौरंग संस्थेला द्यावयाचे असून या संपूर्ण रकमेचा धनादेश चौरंग या नावाने काढण्याबाबत मा.महापौराच्या पत्रास अनुसरुन मा.नगरसचिव यांचे दि.१०/८/२००७ चे पत्र विचारासाठी.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक २३

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २१/८/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ५७८**

मा.अरविंद शिंदे व मा.अजित आपटे यांचे दि. १०/८/२००७ चे पत्र.

राजीव गांधी विचार प्रसारक मंडळ, ट्रस्ट ही नोंदणीकृत संस्था असून गेली १५ वर्ष सामाजिक, शैक्षणिक कार्य करते. हा उपक्रम अधिक लोकांना मिळावा व पुणेकरांना त्याचा लाभ मिळेल म्हणून वॉर्ड क्र. ४६ मध्ये फोटो झिंको समोरील रस्त्यावर ८ बाय ८ फुटाची कार्यालयासाठी दिर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने जागा देण्यात यावी.

**विषय क्र. ५७९**

मा.सौ.संगिता गायकवाड यांचे दि. १३/८/२००७ चे पत्र.

औंध येथे पुणे महापालिकेच्या वतीने स.नं. १५२/५ व १५२/६ मध्ये इमारतीचे बांधकाम पुर्ण केलेले आहे. या जागेत पुर्वीपासूनच ४ आर या क्षेत्राचे पोस्ट ऑफीसकरीता आरक्षण आहे. यानुसारच जागेवर २७५ स्क्वे.मीटर (२९६९ स्क्वे फुट) बांधकाम इमारतीत विषयांकित औंध पोस्ट ऑफीससाठी क्षेत्र पूर्ण केलेले आहे. सद्यस्थितीत औंध भागात पोस्ट ऑफीस नाही. ५० हजार लोकसंख्या असलेल्या औंध नागरिकांची पोस्ट ऑफीससाठी मोठी गैरसोय आहे. तरी विषयांकित बांधकाम पूर्ण असलेली जागा पोस्ट मास्तर जनरल, पुणे १ यांना भाडे कराराने हस्तांतर करण्यात यावी.

**विषय क्र. ५८०**

मा.विकास दांगट यांचे दि. १३/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १३० विकासनगर येथे शौचालय बांधणेसाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. २२, शहरात विविध ठिकाणी सांस्कृतिक हॉल व स्मारक बांधणे, पान क्र. २८१, सीई २८ अे १६०, एस २२-१९ वॉर्ड क्र. १३० मध्ये सांस्कृतिक भवन बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १३० मध्ये विकासनगर येथे शौचालय बांधणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ५८१**

मा.विकास दांगट यांचे दि. १३/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १३० वडगांव बुद्रुकमध्ये श्री पाऊंजाई मंदिर ते सिंहगड रोड, नाल्यामध्ये ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रुपये १५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-७, पावसाळी गटार करणे, पान क्र. ८६, अ.क्र. ४७ हायवेच्या दोन्ही बाजूस पावसाळी गटार लाईन टाकणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १३० वडगांव बुद्रुकमध्ये श्री पाऊंजाई मंदिर ते सिंहगड रोड, नाल्यामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १५ लाख |

**विषय क्र. ५८२**

मा.विकास दांगट यांचे दि. १३/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १३० मध्ये दवाखाना बांधणेसाठी र.रुपये १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-२९, शहरात विविध ठिकाणी भाजी मंड्या बांधणे व विविध विकास कामे करणे, अ.क्र. १३, पा.क्र. २८१, वॉर्ड क्र. १३० येथे भाजी मंडई बांधणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १३० मध्ये दवाखाना बांधणे | --- | १५ लाख |

**विषय क्र. ५८३**

मा.शंकरराव बेलदरे पाटील व मा.संतोष फरांदे यांचे दि. १३/८/२००७ चे पत्र.

कृपया खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-५, शहरात विविध ठिकाणी नविन पाण्याची लाईन टाकणे व दुरुस्ती करणे, अ.क्र. २१६, पा.क्र. मुंढवा गाव ते स.नं. ७७ खराडी येथील पाण्याच्या टाकीपर्यंत एक्सप्रेस पाईप लाईन टाकणे | १ कोटी | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. १४४, १४३, १३६, १३५, १३३ व १४१ मधील पीयुसी लाईन बदलून सी.आय.लाईन टाकणे | --- | १ कोटी |

**विषय क्र. ५८४**

मा.दत्ता धनकवडे व मा.शंकरराव बेलदरे पाटील व मा.शैलेश चरवड यांचे दि. १३/८/२००७ चे पत्र.

कु.प्रसाद कमलाकर गव्हाणे, रा.गुरुकृपा निवास, वडगांव खुाा, सिंहगड रोड, पुणे ४१ याची फ्रान्स येथे होणाऱ्या जागतिक पॉवर लिफ्टींग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवड झालेली आहे. त्यास या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सुमारे रुपये १,३२,०००/- इतका खर्च येणार आहे.

तरी पुणे महानगरपालिकेतर्फे कु.प्रसाद कमलाकर गव्हाणे यास जास्तीत जास्त अर्थसहाय्य करण्यात यावे.

**विषय क्र. ५८५**

मा.बाबूराव चांदेरे व मा.शिवाजी बांगर यांचे दि. १३/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. २८ मध्ये र.रुपये १ कोटी २४ लाख ८० हजाराचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. ए-१, प्रभाग क्र. २८ सूस रस्ता ते बाणेर पाषाण शीव जोडणारा १२.०० मी.डी.पी.रस्ता (आयश्री सोसायटी), | ३४.४० लक्ष | --- |
| यादी क्र. ए-२, पुणे शहरातील मुख्य रस्त्यांची मॅकेनिकल पध्दतीने झाडलोट करणे (मेकॅनिकल स्वीपिंग), | ४५.४५ लक्ष | --- |
| यादी क्र. ए-१२, बाणेर पाषाण शिवेवरील २४.०० मी.डी.पी.रस्ता करणे | ४५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| बाणेर गावठाण व बालेवाडी गावठाण अंतर्गत रस्ते पेव्हींग ब्लॉक बसवून विकसित करणे | --- | १२४.८५ लाख |

**विषय क्र. ५८६**

मा.आबा बागुल यांचे दि. १६/८/२००७ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. २१९ दि. २२/५/२००७ चा फेरविचार करण्यात यावा. (पुणे मनपाच्या प्रभाग क्र. ४३ मधील ई ग्रंथालयासाठी संगणक व साहित्य खरेदी करणेबाबत)

**विषय क्र. ५८७**

मा.कमल व्यवहारे यांचे दि. १६/८/२००७ चे पत्र.

नाट्यचित्र कला अकादमी, पुणे गेली ८ वर्षे सातत्याने कार्यरत असून नाट्य व चित्रपट क्षेत्रातील अनेक नवोदित उपेक्षित कलाकारांना व तंत्रज्ञांना कलेचे दालन खुले करुन त्यांना संधी प्राप्त करुन देण्याचे कार्य करीत आहे. चित्रपट व नाटक क्षेत्रातील कलाकारांच्या उज्वल भविष्यासाठी संस्थेच्या वतीने पुणे शहरात दि. २४ व २५ नोव्हेंबर २००७ रोजी गणेश कला क्रिडा रंगमंच, पुणे येथे 'अखिल भारतीय तिसरे मराठी चित्रपट संमेलन' आयोजित करण्यात येत आहे. या संमेलनासाठी मराठी तसेच हिंदी चित्रपट सृष्टीतील तसेच नाटक क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकार उपस्थित राहणार आहेत.

या संमेलनासाठी र.रुपये ३,००,०००/- (रुपये तीन लाख) आर्थिक सहाय्य करुन पुणे महानगरपालिकेने सहप्रायोजकत्व स्विकारण्यास मान्यता देण्यात यावी. सदर रक्कम रुपये ३,००,०००/- (रुपये तीन लाख) ची आर्थिक तरतुद वर्गीकरणाने उपलब्ध करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्तांना देण्यात यावेत.

**विषय क्र. ५८८**

मा.शैलेश चरवड, मा.दत्ता धनकवडे व मा.संतोष फरांदे यांचे दि. १६/८/२००७ चे पत्र.

कु.मंगेश शांताराम दुधाने, रा.एफ. १४, समर्थपार्क, आनंदनगर, पुणे ५१ याची फ्रान्स येथे होणाऱ्या जागतिक पॉवरलिफ्टींग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवड झालेली आहे. त्यास या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सुमारे १,३२,०००/- इतका खर्च येणार आहे.

तरी पुणे महानगरपालिकेतर्फे कु.मंगेश शांताराम दुधाने यास जास्तीत जास्त अर्थसहाय्य करण्यात यावे.

**विषय क्र. ५८९**

मा.सौ.सीमा सरदेशपांडे व मा.सौ.सुरेखा उर्फ लिना पानसरे यांचे दि. १६/८/२००७ चे पत्र.

२१२ शनिवार पेठ येथील मोकळ्या जागेत कॉर्पोरेशनच्या हद्दीत कॉंक्रीटीकरण करुन ब्लॉक बसविणेकरीता र.रुपये ३.१५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची कामे, वॉर्ड क्र. ५१, पान क्र. ३६, नवा पूल ते बालगंधर्व पूलादरम्यान पद/पथ/उद्याने विकसित करणे | ३.१५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>२१२ शनिवार पेठ येथील मोकळ्या जागेत कॉर्पोरेशनच्या हद्दीत कॉंक्रीटीकरण करुन ब्लॉक बसविणे | --- | ३.१५ लाख |

**विषय क्र. ५९०**

मा.सौ.सीमा सरदेशपांडे व मा.सौ.सुरेखा उर्फ लिना पानसरे यांचे दि. १६/८/२००७ चे पत्र.

रमणबाग शाळेसमोरील मोकळ्या गल्लीत मनपा हद्दीत कॉंक्रीटीकरण करुन ब्लॉक बसविणेकरीता र.रुपये ३.१५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची कामे, पान क्र. ३६, वॉर्ड क्र. ५१, मंदार लॉज ते माणकेश्वर विष्णु चौक कन्याशाळेच्या समोरील बाजूस फुटपाथ करणे | ३.१५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>रमणबाग शाळेसमोरील मोकळ्या गल्लीत मनपा हद्दीत कॉंक्रीटीकरण करुन ब्लॉक बसविणे | --- | ३.१५ लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. ५९१**

दि. २३/७/२००७ ते दि. २९/७/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/३१४ दि. १०/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ५९२**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १०/३/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ७/७/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१४१ दि. १४/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ५९३**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ७/४/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ४/८/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१४२ दि. १४/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. ५९४**

दि. ३०/७/२००७ ते दि. ५/८/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १० आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/३३२ दि. १६/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्रं. ५९५**

मा.क्षेत्रिय अधिकारी, कर्वेरोड क्षेत्रिय कार्यालय यांचे नियंत्रणाखालील भवन विभागाकडील सन २००३-०४ व २००४-०५ या आर्थिक वर्षातील टेंडरद्वारे करुन घेतलेल्या विविध कामाचे उपलब्ध कागदपत्राची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/१४५ दि. १४/८/२००७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १ सन २००७-२००८ चा विचारासाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. ५९६**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. नसजा/३०९१ दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ५९७**

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडील श्री.अनिल रामचंद्र ओरपे, आरोग्य निरिक्षक, भूमी व जिंदगी कार्यालयाकडील श्री.जगदीश शामराव सोनवणे,सरलेखनिक व उद्यान कार्यालयाकडील श्री.कृष्णा लक्ष्मण फडके, ज्युनिअर ग्रेड लेखनिक यांना पुणे मनपा सेवेतून काढून टाकणेस (ठर्शोरिश्र श्री ड्शीोिळलश) मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहआ/से/३१७ दि. १३/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ५९८**

पुणे महानगरपालिकेच्या अति.नगर अभियंता, पाणी पुरवठा विभागाकडील बिगारी सेवक श्री.दिनेश अशोक शिंदे यांचे निलंबनास दि. १५/१२/२००६ रोजी सहावी सहामाही व दि. १५/६/२००७ रोजी सातवी सहामाही पूर्ण झाली आहे. सदरची बाब मनपा सेवानियम ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहआ/से/३१८ दि. १३/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ५९९**

घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाकडील मोकादम सेवक श्री.शंकर भिमराव अडागळे यांचे निलंबन काळास दि. ७/८/२००७ रोजी नववी सहामाही पूर्ण होत असल्याने सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ मधील तरतुदीनुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहआ/से/३१९ दि. १३/८/२००७ चे पत्र.

**ठरावान्वये आलेले अभिप्राय**

**विषय क्रं. ६००**

पुणे मनपाच्या इमारतीमध्ये मा.सभासदांसाठी ग्रंथालय (अभ्यासिका) चालू करणेबाबत मा.रविंद्र धंगेकर व मा.ॲड्.किशोर शिंदे यांचे दि. २२/५/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. २६९ दि. ३०/५/२००७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/जसंका/३२१ दि. १६/८/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स**

**विषय क्रं. ६०१**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्प झोन क्र. ६ बाणेर पॅनकार्ड क्लब रस्त्यापासून वृंदावन सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर तसेच बालेवाडी फाटा ते हॉटेल सदानंद रिसोर्ट या भागात बाणेर रस्त्याच्या बाजुच्या सोसा.मध्ये मलवाहिन्या टाकणे (सन २००६-०७) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.विनोद मुथा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३९,९९,५८०/- पेक्षा ८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३६,७९,६१३=६० अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/३०७ दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६०२**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्प झोन क्र. ६ बावधन येथे बावधनगांव, देशमुखनगर, एल.एम.डी.नगर इ. परिसरात मलवाहिनी टाकणे (सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.विनोद मुथा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,९७२/- पेक्षा ३% जास्त)(५% कमी तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १८,९९,९७३=४० अधिक भाववाढ सुत्रानुसार काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/३०८ दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६०३**

सोनवणे हॉस्पिटल ते जे.के.सोसायटी शंकरशेठ रोड नागझरी नाल्यात ६००, ४५० व ३०० मि.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे व तद्.कामे करणे (१० इंच - ५० र.मी., १२इंच - १०० र.मी., २४ इंच - ४०० र.मी.) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.साईगणेश डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,८५२/- पेक्षा १% कमी तडजोडीने) (मूळ टेंडर दर ७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २४,७४,८५३=४८ पर्यंत करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/३०९ दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६०४**

वॉर्ड क्र. २३ ईश्वरकृपा सोसायटी व अश्विनी सोसायटी येथे ४५० मि.मी. व्यासाची व ३०० मि.मी. व्यासाची ३५० र.मी. ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार श्री.अनिल भिमसेन कोनुरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,६३२/- पेक्षा २३.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १५,२८,७१८=६६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/३१० दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६०५**

पुणे मनपा वॉर्ड क्र. ११६ पर्वती चाळ क्र. १०८ पर्वती दर्शन येथे सामाजिक सभागृह बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार संदीप एस.गायकवाड यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९९,१४७/- पेक्षा १८% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,७८,९९३=४६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/३११ दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६०६**

गुळवणी महाराज रस्ता येथे फूटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.पुरुषोत्तम गेनू डोंगरे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९९,९९१/- पेक्षा २१.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,७१,४९२=९७ पर्यंत काम करुन घेणेस व डांबर/सिमेंट व लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणेस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/३१२ दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६०७**

भांडारकर रस्ता येथे फूटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडसपैकी ठेकेदार मे.एम.जी.लुकडे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,२९०/- पेक्षा २१.८६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १९,५२,९४५=२१ पर्यंत काम करुन घेणेस व डांबर/सिमेंट व लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणेस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/३१३ दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६०८**

कमला नेहरु हॉस्पिटल येथे विविध पॅसेजर व बेल लिफ्ट पुरविणे व बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.टेक्नो इंडस्ट्रीज लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९७,५१,२९०/- पेक्षा २४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ७४,१०,९८०=४० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/३२२ दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६०९**

वडगांव बुा करीता इन्स्टिटयूट ई.एस.आर.पासून वितरण व्यवस्था निर्माण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.विनोद मुथा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४१,०१,८६०/- पेक्षा १३.१४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३५,६२,८७५=६० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/प्र/३२३ दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६१०**

दत्तवाडी (फा.प्लॉट नं. ५४३ पर्वती) येथे मनपा शाळा इमारत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार वैष्णव कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,७९०=५० पेक्षा ४.९८% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २०,९९,३८०=०७ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/३२४ दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६११**

मनपा शाळा क्र. ९१ मुलींची व १६२ मुलांची येथे नविन इमारत बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.रोहित कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २२,९७,४१८/- पेक्षा ४.९९% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २४,१२,०५९=१६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/३२५ दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६१२**

मौजे कात्रज स.नं. १४६ येथील तलावाचे बाजूस स्टोन पिंचिंग करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १५ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस.एस.विटकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,४३,३५०/- पेक्षा २३.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २२,५७,५४९=४५ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/३२६ दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६१३**

पुणे महानगरपालिकेकरीता २ एम.बी.पी.एस. बॅक अप लिंक २५ ठिकाणी जोडणीकरणाच्या कामासाठी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ निविदांपैकी दोन टेंडरदार अटी व शर्तीच्या पात्रतेमध्ये बसत नसल्याने व तिसरे टेंडरदार यांचे टेंडर कंडीशनल असल्याने सदरचे काम चौथे टेंडरदार टुलीप आयटी सर्व्हिसेस लि. यांचेकडून त्यांचे दरानुसार रक्कम रुपये ५,०००/- प्रति महिना प्रति ठिकाण प्रमाणे २५ ठिकाणांचे (लोकेशन) एकूण र.रुपये १,२५,०००/- प्रति महिना प्रमाणे ३ वर्षाचे (३६ महिने) कालावधीकरीता करुन घेणेसाठी त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मुले/३२८ दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६१४**

पुणे मनपा बहिरोबा पंपिंगच्या बाजुने आर.सी.सी.मध्ये संरक्षक भिंत बांधणे, चेनलिंक फेन्सिंग करणे व तद्.कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.सोहम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,४५२/- पेक्षा १६.६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २०,८३,०४३=३० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/३२९ दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६१५**

बहिरोबा एसटीपी प्लॅन्ट ते वानवडीपर्यंतच्या बहिरोबा नाला व त्याला येऊन मिळणाऱ्या ड्रेनेज लाईनची साफसफाई करणे, कनेक्शन करणे, कनेक्टिव्हीटीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.शुभंकर कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,९९,४६०/- पेक्षा १६.३४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,५४,४४८=२४ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/३३० दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६१६**

वॉर्ड क्र. ९५ हडपसर काळे पडळ परिसरात पावसाचे पाणी वाहून जाण्याकरीता ९०० मि.मी. व्यासाची पावसाळी लाईन टाकणे (भाग-अ) वाय ९/२८/५/१ ते वाय २८/५/१०/९ पर्यंत कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.सिध्दीविनायक एंटरप्राईजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४५,२७,९००/- पेक्षा २२.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३५,२१,८००=६२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/३३१ दि. १६/८/२००७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ६१७**

आरोग्य खात्याकडील न्युअसन्स डिटेक्शन विभागाकडील न्युअसन्स डिटेक्टर पदाच्या रिक्त जागांवर नेमणूक करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. अतिमआ(ज)/एचओ/२९५ दि. ३१/७/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. ७/८/२००७ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ६१८**

घोषित झोपडपट्टीमधील झोपडीधारकांसाठी वैयक्तिक शौचालय योजना अंतर्गत अनुदान देणेसाठी मनपा निधीतून खर्च करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उपआ(गवनि)/३०५ दि. १०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६१९**

प्रतिवर्षीप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज यांच्या दि. ९/७/२००७ रोजी पालखी आगमन प्रसंगी दिंडी प्रमुखांच्या सत्कारप्रसंगी नारळ मागविण्यात आले होते. सबब मे.कोंडीबा हणमंतराव, ६३० गणेश पेठ, पुणे २ यांनी नारळ पुरविल्याप्रित्यर्थ मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम कलम ५-२-२ नुसार करारनामा न करता र.रुपये १२,३८०/- चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून त्यांना सदर बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ३१७२ दि. १४/८/२००७ चे पत्र.

१-मुख्य देखरेख वसूली वगैरे, क.मनपा नि स्थायी समिती, १-नगरसचिव यांचे कार्यालय, ९. र- श्री संत ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराज पालखी स्वागत व दिंडी प्रमुखांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार, सन २००७-०८ मान्य तरतुद र.रुपये १,२५,०००/-.

**विषय क्र. ६२०**

पुणे मनपाचे विविध खात्याकडे 'कनिष्ठ अभियंता (सिव्हील)' यांची नव्याने सहा महिने मुदतीकरीता करार पध्दतीने नेमणूक करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/३२० दि. १४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६२१**

बाणेर स.नं. ७, ४९/१ येथील जैव विविधता उद्यानासाठीच्या जागेची मोजणी फी अदा करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उद्यान/३२७ दि. १६/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६२२**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता, मा.बापूसाहेब पठारे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.अरुण धिमधिमे व मा.उज्वल केसकर यांचे दि. १७/८/२००७ चे पत्र.

१ ऑक्टोंबर या दिवशी दरवर्षी जागतिक वृध्ददिन आणि त्यानिमित्त आनंद मेळावा साजरा केला जातो. यावर्षी पुणे मनपाने सहप्रायोजिकत्व स्विकारुन मनपाच्या गणेश कला क्रिडा याठिकाणी साजरा करण्यात यावा.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✽ स्थायी समिती ✽**

कार्यपत्रिका क्रमांक २५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ४/९/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ६६०**

मा.सौ.पार्वती भडके व मा.श्रीमती लता राजगुरु यांचे दि. २४/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४४ येथील स.नं. १२४/२८३ येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने १० बाय १० ची खोली बांधण्यात आलेली आहे. सदर खोलीचा वापर सध्या कोणीही करीत नाही. तरी सदरची बांधलेली खोली सावित्री बचत गट, भिमनगर या महिला बचत गटास विविध समाजउपयोगी कार्यासाठी देण्यात यावी.

**विषय क्र. ६६१**

मा.बाळासाहेब कापरे व मा.शैलेश चरवड यांचे दि. २४/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२८ मध्ये सनसिटी रोडला पाण्याची लाईन टाकणेसाठी र.रुपये ८ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, अ.क्र. २ मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड (मॅनहोल), उपमुख्य मलनि:सारणसंबंधी इतर कामे, शहरात विविध ठिकाणी नविन ड्रेनेजलाईन टाकणे व दुरुस्ती करणे (यादी एस-६), अ.क्र. १४५, वॉर्ड क्र. १२८ सनसिटीकडुन सुंदररचना ते प्रथमेश नगरीपर्यंत १८ इंची ड्रेनेज लाईन टाकणे | ८ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १२८ मध्ये सनसिटी रोडला १२ इंची पाण्याची लाईन टाकणे | --- | ८ लाख |

**विषय क्र. ६६२**

मा.सुनिल बिबवे व मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि. २७/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२३ बिबवेवाडी गावातील रस्ते डांबरीकरण करणेकरिता र.रुपये ५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, पान क्र. २८१, अ.क्र. १२, यादी क्र. एस-२९, शहरात विविध ठिकाणी भाजी मंड्या बांधणे व विविध विकास कामे करणे, वॉर्ड क्र. १२३ बिबवेवाडी गावात भाजी मंड्या बांधणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १२३ बिबवेवाडी गावातील रस्ते डांबरीकरण करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ६६३**

मा.संतोष आरडे व मा.ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि. २९/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. २० मध्ये समाजमंदिर बांधणेकरिता र.रुपये ८ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-१९, शहरात विविध ठिकाणी शौचालये बांधणे व दुरुस्ती करणे, पान क्र. ३०७, अ.क्र. १, वॉर्ड क्र. २० स.नं. १२ संतोष मित्र मंडळाजवळ सुलभ शौचालय बांधणे | ८ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. २० मध्ये समाजमंदिर बांधणे | --- | ८ लाख |

**विषय क्र. ६६४**

मा.बाळासाहेब कापरे व मा.अक्रुरशेठ कुदळेपाटील यांचे दि. २९/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२८ विठ्ठलवाडी शांती कॉर्नर ते साई गणेश अपार्टमेंटपर्यंत पावसाळी गटार करणेसाठी र.रुपये ५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी एस-७, पावसाळी गटारे करणे, पान क्र. ८६, अ.क्र. ४६, वॉर्ड क्र. १२८ स्टार गार्डन ते सौरव गार्डनपर्यंत पावसाळी गटार करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १२८ विठ्ठलवाडी शांती कॉर्नर ते साई गणेश अपार्टमेंटपर्यंत पावसाळी गटार करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ६६५**

मा.बाळासाहेब कापरे व मा.अक्रुरशेठ कुदळेपाटील यांचे दि. २९/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२८ विठ्ठलवाडी स.नं. ११ ग्रीनपार्क सोसायटी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रुपये ७ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी एस-६, शहरात विविध ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्ती करणे, वॉर्ड क्र. १२८ विठ्ठलनगर ते एकतानगरपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे | ७ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १२८ विठ्ठलवाडी स.नं. ११ ग्रीनपार्क सोसायटी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे | --- | ७ लाख |

**विषय क्र. ६६६**

मा.आबा बागुल व मा.वसंत मोरे यांचे दि. ३०/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११६ पर्वती दर्शन इंडस्ट्रीज पर्वती दर्शन चाळ क्र. ८९, १०८ विविध ठिकाणी शौचालयाकरिता ड्रेनेज, पाण्याची लाईन टाकणे व ड्रेनेजविषयक विविध कामे करणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-१३, शहरातील नागझरी नाले सुधारण्यासाठी, पान क्र. ८३, अ.क्र. ४२, वॉर्ड क्र. ११६ पर्वती इंडस्ट्रीज परिसरातील नाला चॅनेलायझेशन करणे व मुख्य रस्त्यावर स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ११६ पर्वती दर्शन इंडस्ट्रीज पर्वती दर्शन चाळ क्र. ८९, १०८ विविध ठिकाणी शौचालयाकरिता ड्रेनेज, पाण्याची लाईन टाकणे व ड्रेनेजविषयक विविध कामे करणे | --- | २० लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ६६७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १४/४/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ११/८/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१४९ दि. २२/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. ६६८**

दि. ६/८/२००७ ते दि. १२/८/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १३ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/३६२ दि. २४/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ६६९**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २१/४/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १८/८/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१६० दि. २९/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ६७०**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/१४६ दि. २१/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६७१**

पुणे मनपा हद्दीतील प्रस्तावित पथ/पाणीपुरवठा/विद्युत विषयक तातडीची कामे पूर्ण करण्यासाठी स्थायी समितीचे ठरावानुसार मान्यता मिळालेल्या उमेदवारांना कनिष्ठ अभियंता या पदाचा एकवट मोबदला रक्कम रुपये ४,५००/- या ऐवजी कनिष्ठ अभियंता या पदासाठी मान्य असणाऱ्या वेतनश्रेणीचे सुरवातीचे रुपये ५,५००/- हे मूळ वेतन धरुन त्यावर देय होणारे एकूण भत्ते मिळून होणारी रक्कम (अंदाजे र.रुपये १४,०००/-) दरमहा एकवट मोबदला म्हणून उमेदवार हजर होतील त्या दिनांकापासून आदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/३४९ दि. २४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६७२**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/१६२ दि. ३०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६७३**

श्री.बोराटे गजानन तुकाराम, शिपाई, नगरसचिव कार्यालय यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ३३९९ दि. ३०/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६७४**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ३४०३ दि. ३०/८/२००७ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्रं. ६७५**

पुणे, पेठ भवानी, सि.स.नं. ८६,८७, ८५ व अगडशा बाबा चौक ते डावरे चौक येथील रस्ता रुंदीसाठी जागा संपादन करणेबाबत मा.विरेंद्र किराड व मा.अरुण धिमधिमे यांचे दि. ७/६/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ३४६ दि. १२/६/२००७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/भूसंपादन/३६५ दि. २७/८/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ६७६**

वॉर्ड क्र. २१ मध्ये जयजवाननगर, पांडु लमाण वस्ती, नाईकनगर, रामनगर येथील धोकादायक पोल शिफ्टींग करुन विद्युत केबल अंडरग्राऊंड करण्यासाठी र.रुपये १५ लाखाचे वर्गीकरणाबाबत मा.संजय भोसले व मा.राजेंद्र वागसकर यांचे दि. १८/४/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १०७ दि. २४/४/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/३६८ दि. २७/८/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ६७७**

वॉर्ड क्र. १०४ पु.ल.देशपांडे उद्यान येथे फरशी व कॉंक्रीटीकरण करण्यासाठी र.रुपये ३ लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.शंकर पवार व मा.राजेंद्र गोरडे यांचे दि. ७/५/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. २०१ दि. २२/५/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. अतिमआ/मुले/३६९ दि. २७/८/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ६७८**

वॉर्ड क्र. ११४ मधील जनता वसाहत शंकर मंदिर जवळील मोडकळीस आलेला पत्र्याचा पायपूल (फूटब्रीज) काढून नविन पायपूल (फूटब्रीज) तयार करण्याकरिता र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.दिपक गावडे व मा.महादेव बाबर यांचे दि. ३०/४/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १७८ दि. ८/५/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. अतिमआ/मुले/३७० दि. २७/८/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ६७९**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद या संस्थेस शैक्षणिक कामासाठी र.रुपये ५० लाखाची मदत करणेबाबत मा.पृथ्वीराज सुतार व मा.उज्वल केसकर यांचे दि. २०/४/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १४४ दि. ३/५/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/३७१ दि. २७/८/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ६८०**

वॉर्ड क्र. २१ मध्ये कामांसाठी र.रुपये ६० लाखाचे वर्गीकरण करणेबाबत मा.संजय भोसले व मा.राजेंद्र वागसकर यांचे दि. १८/४/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. १०६ दि. २४/४/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. अतिमआ/मुले/३७२ दि. २७/८/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स**

**विषय क्रं. ६८१**

ए.एफ.एम.सी. ते भैरोबानाला पोलिस चौकीदरम्यानची ३५० मि.मी. व्यासाची जलवितरण नलिका रस्ता रुंदीकरणाबाहेर हटविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार श्री.एस.बी.माने यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,४९,९३५/- पेक्षा ११.६९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,८०,४३७=६० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/३५१ दि. २४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६८२**

वानवडी बाजार पोलिस चौकी ते ए.एफ.एम.सी. दरम्यानची ३५० मि.मी. व्यासाची जलवितरण नलिका रस्ता रुंदीकरणाबाहेर हटविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार श्री.एस.बी.माने यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,४९,९३५/- पेक्षा ११.६९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१२,८०,४३७=६० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/३५२ दि.२४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६८३**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्पातील झोन क्र. ४ मुंढवा गाव ते मुंढवा मैलापाणी शुध्दीकरण केंद्रापर्यंत नदीच्या कडेने मुख्य मलवाहिनी टाकणे (टप्पा क्र. १) सन २००७-०८ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.मनोज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,९८,९८०/- पेक्षा १८.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४०,८४,१६६=६६ अधिक भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/३५४ दि.२४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६८४**

झोन क्र. ३, धायरी नाल्यामध्ये मुख्य मलवाहिनी टाकणे व पठारावर मलवाहिन्या टाकणे (सन २००६-०७) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.गुडविल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३९,९९,४८७/- पेक्षा ४.४९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३८,१९,९१०=०३ अधिक भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/३५५ दि. २४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६८५**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्पातील झोन क्र. ५ कळस येथील गणेशनगर व इतर परिसरात मैलापाणी गोळा करण्यासाठी मलवाहिनी टाकणे (सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार मे.ओंकार ग्रुप यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,६६४/- पेक्षा १८.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २०,४५,२२५=०८ अधिक भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/३५६ दि. २४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६८६**

बाणेर येथील सदानंद हॉटेललगतच्या परिसरात मलवाहिन्या टाकणे (सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार मे.बारटक्के कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४,९९,९६७/- पेक्षा १४.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २१,२४,९९६=९५ अधिक भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/३५७ दि. २४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६८७**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्पातील झोन क्र. ४ पुणे सोलापूर रस्ता साधना विद्यालय, पारिजात सोसायटी, इंद्रप्रस्थ सोसायटी व त्या परिसरातील तसेच सोलापूर रोड मत्स्य बिज केंद्र ते लक्ष्मी कॉलनी मलवाहिनी टाकणे (सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.विनोद मुथा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९९,२५०/- पेक्षा १६.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २४,८९,६७७=४३ अधिक भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/३५८ दि. २४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६८८**

बुलढाणा होस्टेल ते बाणेर रस्ता नाल्याच्या कडेने मलवाहिनी टाकणे (सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.विनोद मुथा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३९,९९,०८५/- पेक्षा १२.११% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३४,१५,७९५=८१ अधिक भाववाढ सुत्रानूसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/३५९ दि. २४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६८९**

वॉर्ड क्र. २५ बोपोडी सर्व्हे क्र. २४ ते भाऊ पाटील रस्ता येथे ४५० मि.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.साई गणेश डेव्हलपर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,७१८/- पेक्षा १५.१५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १६,९६,७६०=७२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/३६१ दि. २४/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६९०**

पुणे महानगरपालिकेच्या शहरातील कचरा उचलणेसाठी ३.८ क्यु.मी.क्षमतेचे कंटेनर खरेदी करणेपोटी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.अद्या एनव्हायरोमेंटल्स, पुणे व मे.आवटे फॅब्रि.ॲण्ड ऑटो.वर्क्स, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून र.रुपये २७,७००/- प्रति कंटेनर सर्व करांसह - ११७ नग प्रत्येकी र.रुपये ३२,४०,९००/- ह्याप्रमाणे एकूण र.रुपये ६४,८१,८००/- पर्यंत कंटेनर खरेदी करणेपोटी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/३६३ दि. २४/८/२००७ चे पत्र.

### मागील सभेचे विषय

**विषय क्र. ६९१**

पुणे, पेठ भवानी, 'भवानी माता मंदिर रस्ता' जुना मोटार स्टॅण्ड ते कॅन्टोमेंट हद्दीपर्यंत रुंद करणेबाबत रस्त्याची भूसंपादनाची कार्यवाही मा.भुमि संपादन विशेष अधिकारी क्र. १५ यांचेमार्फत सुरु असून प्रकरण प्राथमिक अवस्थेत असल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूसं)/२६४ दि. १७/७/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १४/७/२००७ च्या सभेत ठरले होते.)

### संकिर्ण

**विषय क्र. ६९२**

पुणे महानगरपालिकेच्या मनपा निधीमध्ये उपलब्ध होणाऱ्या रक्कम रुपये ३० कोटीची १ वर्ष मुदतीसाठी गुंतवणूक करणेबाबत दरपत्रके मागविली असता आलेल्या १० दरपत्रकांपैकी स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे यांचा ९.६०% हा व्याजदर सर्वाधिक असल्याने र.रुपये ३० कोटी १ वर्ष मुदतीसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, पुणे कॅम्प, पुणे या राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणूक करण्यास अथवा प्रत्यक्ष गुंतवणूक होईपर्यंत मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात नमूद केल्याप्रमाणे किंवा इतर राष्ट्रीयकृत बँकानी ९.६०% पेक्षा अधिक व्याजदर दिल्यास सदरच्या बँकेत गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/३६६ दि. २७/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६९३**

सन १९८७ चे मान्य विकास आराखड्यानुसार बिबवेवाडी स.नं. ६९१ बी ही मिळकत हॉस्पिटल (हॉस्पिटल-२) साठी आरक्षित दर्शविलेली आहे. या मिळकतीचे एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम १२७ चे अनुषंगाने दिलेल्या खरेदी सूचनेनुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस स्थायी समितीमार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/३७३ दि. २७/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ६९४**

मा.वसंत मोरे व मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. ३०/८/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १४१ मध्ये शेलारमळा, महादेवनगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रुपये ७ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-७, पावसाळी गटारे करणे, पान क्र. ८६, अ.क्र. ५७, वॉर्ड क्र. १४१ कात्रज गावठाण परिसरात पावसाळी गटार करणे | ७ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १४१ मध्ये शेलारमळा, महादेवनगर परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे | --- | ७ लाख |

**विषय क्रं. ६९५**

कोंढवा खुा, स.नं. ३८ पैकी जागेमध्ये ८४२ चौ.मी.क्षेत्रावर पोलिस चौकीचे आरक्षणानुसार आरक्षित जागेचे संपादन करण्याची कार्यवाही सुरु करणेबाबत मा.महादेव बाबर व मा.विजय मारटकर यांचे दि. १७/७/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिति ठराव क्रं. ५०२ दि. ३१/७/२००७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/उआ(भूसं)/३७४ दि. ३०/८/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक २६

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. १३/९/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७००**

मा.सौ.पार्वती भडके व मा.सुनिल गोगले यांचे दि. १/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४४, सेंट पेट्रीट टाऊनमध्ये शाहु चौक ते बी.टी.कवडे रोडला जोडणारा रस्ता करण्यासाठी स.नं. ५२ व स.नं. ५३ मधुन जागा संपादन करण्यात यावी.

**विषय क्र. ७०१**

मा.सौ.रजनी त्रिभुवन यांचे दि. ३/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ३८ मध्ये ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालयापासून ते सिटी पॉईंटपर्यंत फुटपाथ करण्यासाठी र.रुपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, अ व क मधील सन २००६-०७ मध्ये सुचविण्यात आलेली परंतू दि. ३१ मार्च २००७ नंतर खर्च पडत असल्याने सुचविण्यात आलेली रक्कम, ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय, वॉर्ड क्र. ३८ (जुना २६), (पान एस.पी.आय.एल.-७), स.नं. ३४७/१८८ ताडीवाला रोड सिटी पॉईटींग समोरील जागा ताब्यात घेऊन शाळा बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ३८ मध्ये ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालयापासून ते सिटी पॉईंटपर्यंत फुटपाथ करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ७०२**

मा.बाबुराव चांदेरे व मा.श्रीकांत पाटील यांचे दि. ३/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. २८ बाणेर गावठाण व बालेवाडी गावठाण व परिसरातील रस्ते इंटरलॉकींग ब्लॉक बसवून विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रुपये १४१.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, | | |
| यादी क्र. ए-२, शहरातील रस्ते नियोजनाने डांबरीकरण करणे, | | |
| पान क्र. २३९, अ.क्र. ६५ बाणेर-बालेवाडी रस्ता रुंद करणे व कल्व्हर्ट बांधणे | ५ लाख | --- |
| पान क्र. २३९, अ.क्र. ६९ बाणेर रस्ता येथे कल्व्हर्ट रुंद करणे | ६७.५० लाख | --- |
| यादी क्र. ए-१२, एकात्मिक रस्ते विकास योजना व्यतिरिक्त स्पील कामे, | | |
| पान नं. २४४, अ.क्र. १, बायपासकडे जाणारा रस्ता करणे | ३७.५० लाख | --- |
| पान क्र. २४४, अ.क्र. ७ विधाते वस्ती ते बाणेर गावाकडे जाणारा जुना रस्ता दोन ठिकाणी कल्व्हर्ट बांधून रस्ता डांबरीकरण करणे. | १३.५० लाख | --- |

| | | |
|---|---|---|
| यादी क्र. जी-६ सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, जुनी मोडकळीस आलेली पाडून नव्याने बांधावयाची शौचालये, पान नं. २६२, अ.क्र. ५, बाणेर गावठाण नाल्याजवळ शौचालय बांधणे | १० लाख | --- |
| यादी क्र. एस-१९ शहरात विविध ठिकाणी शौचालये बांधणे व दुरुस्ती करणे, पान नं. ३०७, अ.क्र. १०, बाणेर-बालेवाडी परिसरात सुलभ शौचालये बांधणे | ८ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| बाणेर गावठाण व बालेवाडी गावठाण व परिसरातील रस्ते इंटरलॉकींग ब्लॉक बसवून विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १४१.५० लाख |

**विषय क्र. ७०३**

मा.सागर माळकर व मा.सचिन भगत यांचे दि. ४/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ६ मध्ये खालील कामांसाठी र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी एस-१३, पान क्र. ८३, अ.क्र. ४, वॉर्ड क्र. ६ मधील नाला चॅनेलायझेशन करणे व मुख्य रस्त्यावर स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ६ परिसरात पाण्याची लाईन टाकणे | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. ६ परिसरात ड्रेनेज लाईन करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ७०४**

मा.सौ.मंगला मंत्री व मा.सौ.मेधा कुलकर्णी यांचे दि. ६/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४५ मधील पंचशीलनगर, घोरपडी गाव येथे सार्वजनिक शौचालय बांधणेकरीता र.रुपये ५ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी एस-६, शहरात विविध ठिकाणी नविन ड्रेनेज लाईन टाकणे व दुरुस्त करणे, पान क्र. ७८, अ.क्र. ५३, वॉर्ड क्र. ४५ डोबरवाडी, सोपनबाग येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे, (मान्य तरतुद र.रुपये १० लाख) | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४५ मधील पंचशीलनगर, घोरपडी गाव येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ७०५**

मा.सौ.मंगला मंत्री व मा.दिपक गावडे यांचे दि. ६/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४५ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणेकरीता र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. डी-१ बी, २-गटारे व नाले, २-मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड, मुख्य मलनि:सारण नलिका, मलनि:सारणसंबंधी कामे करणे, अ-शहराच्या मध्यवर्ती भागासाठी, ब-शहराच्या इतर भागासाठी, पान क्र. ५२, अ.क्र. १३, बी.टी.कवडे रोड ते बहिरोबा नाल्यापर्यंत ६०० मि.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४५ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ७०६**

मा.दिपक गावडे व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. ६/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत शंकर मंदिराजवळील मोडकळीस आलेला पत्र्याचा पाय पूल (फूट ब्रिज) काढून नविन पायपूल (फूट ब्रिज) तयार करणेकरिता र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, पथ विभागाच्या कामाच्या याद्या, यादी क्र. ए-१, नविन पथांची सुधारणा कामे, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पान क्र. २३६, अ.क्र. ३२, वॉर्ड क्र. ११४ (सिंहगड रस्त्यावरुन जनता वसाहतीकडे जाण्यासाठी (पर्वती स.नं. मधून) रस्ता विकसित करणे व कॅनॉलवर पूल बांधणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत शंकर मंदिराजवळील मोडकळीस आलेला पत्र्याचा पाय पूल (फूट ब्रिज) काढून नविन पायपूल (फूट ब्रिज) तयार करणे | --- | १० लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. ७०७**

दि. १३/८/२००७ ते दि. १९/८/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १३ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/३८६ दि. ३१/८/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. ७०८**

दि. २०/८/२००७ ते दि. २६/८/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ११ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/४०१ दि. ४/९/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ७०९**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/१६९ दि. ३/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७१०**

गुंठेवारी विभागामध्ये करारपध्दतीने काम केलेल्या श्री.सागर चंद्रकांत भोसले आणि श्री.चेतन विजय खेडेकर यांची करारपध्दतीने ६ महिने मुदतीकरीता कनिष्ठ अभियंता या पदावर दरमहा मोबदला रक्कम रुपये ४,५००/- अदा करणेस व नेमणूका करणेस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ व ७४ नुसार मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/३९६ दि. ३/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७११**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/१७२ दि. ६/९/२००७ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्रं. ७१२**

वॉर्ड क्र. १४४ परिसरातील पाणीपुरवठा वाहिन्यांचे नेटवर्क हे सी.आय.मध्ये करण्यासाठी रक्कम रुपये २ कोटी २५ लाख तरतूद करणेबाबत मा.शंकरराव बेलदरे(पाटील) व मा.सुनिल बनकर यांचे दि. ३०/५/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ३१६ दि. ६/६/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/३८९ दि. ३/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७१३**

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या महिला व्यासपीठास र.रुपये ३ लाख मदत करणेबाबत मा.सौ.उषाताई कळमकर व मा.सौ.अलका खाडे यांचे दि. १८/५/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. २६६ दि. ३०/५/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/३९४ दि. ३/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७१४**

विविध खेळांच्या स्पर्धांसाठी परदेशी जाणाऱ्या खेळाडूंसाठी आर्थिक मदत देणेकरिता अंदाजपत्रकात तदतूद करणेबाबत मा.अनिल भोसले, सभागृह नेता व मा.निलेश निकम यांचे दि. १०/४/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ६५ दि. १७/४/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/३९५ दि. ३/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७१५**

कु.मंगेश शांताराम दुधाने यांची फ्रान्स येथे होणाऱ्या जागतिक पॉवर लिफ्टींग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवड झाल्याने त्यास पुणे मनपातर्फे १,३२,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत मा.शैलेश चरवड, मा.दत्तात्रय धनकवडे व मा.संतोष फरांदे यांचे दि. १६/८/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ५९२ दि. २१/८/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/४११ दि. ६/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७१६**

कु.प्रसाद कमलाकर गव्हाणे यांची फ्रान्स येथे होणाऱ्या जागतिक पॉवर लिफ्टींग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निवड झाल्याने त्यास पुणे मनपातर्फे १,३२,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत मा.दत्तात्रय धनकवडे, मा.शंकरराव बेलदरेपाटील व मा.शैलेश चरवड यांचे दि. १३/८/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ५८८ दि. २१/८/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/४१२ दि. ६/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७१७**

कु.सायली पेंढारकर या जलतरणपटूस परदेशात आमंत्रित केले असून त्यासाठी पुणे महानगरपालिकेतर्फे र.रुपये ४ लाख मदत करणेबाबत मा.चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व मा.तानाजी लोणकर यांचे दि. १२/७/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ५०० दि. ३१/७/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/४१३ दि. ६/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७१८**

पुण्यातील ३ जलतरणपटूंना परदेशात आमंत्रित केले असून त्यासाठी र.रुपये ४ लाख मदत करणेबाबत मा.विकास मठकरी, विरोधी पक्षनेते व मा.बाबु वागस्कर यांचे दि. २४/७/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ५३२ दि. ३१/७/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/४१४दि. ६/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७१९**

लंडन येथे स्काऊट व गाईड संस्थेच्या जागतिक जांबोरीसाठी पुण्याचे विद्यार्थी व शिक्षक सहभागी होणार असून त्यांना पुणे महानगरपालिकेतर्फे र.रुपये १२,५०,०००/- मदत करणेबाबत मा.सुनिल बनकर व मा.संदीप लडकत यांचे दि. १७/७/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ५०३ दि. ३१/७/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/मुले/४१५ दि. ६/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७२०**

राजीव गांधी विचार प्रसारक मंडळ यांना कार्यालयासाठी वॉर्ड क्र. ४६ मध्ये फोटोझिंको समोरील रस्त्यावर ८ फुट बाय ८ फुट जागा दिर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्याबाबत मा.अरविंद शिंदे व मा.अजित आपटे यांचे दि. १०/८/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ५८२ दि. २१/८/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/भूसंपादन/४१६ दि. ६/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७२१**

वॉर्ड क्र. २१ मधील स.नं. १४ रामनगर श्रीराम मंदिर चौक येथील १२ बाय १२ ची जागा शिवप्रेमी प्रतिष्ठाण संस्थेस सामाजिक उपक्रमासाठी दिर्घ मुदतीच्या व नाममात्र भाड्याने देणेबाबत मा.संजय भोसले व मा.श्रीकांत पुजारी यांचे दि. २/७/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ४५८ दि. १७/७/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्रं. मआ/भूसंपादन/४१७ दि. ६/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. ७२२**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्प झोन क्र. ४, स.नं. ४७, कृष्णानगर, स.नं. ५६ येथे अंतर्गत मलवाहिन्या टाकणे (सन २००६-०७) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार मे.संतोष पिसे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९९,९५७=८० पेक्षा १६.१६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २५,१५,१६४=६२ अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/३७९ दि. ३१/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७२३**

मनपाचे जेटिंग मशिन देखभाल व दुरुस्तीसह शहरातील ड्रेनेज लाईन ठेका पध्दतीने साफ करुन घेणेबाबत टेंडर्स मागविले असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी मे.अंकिता इंजिनिअर्स यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून ५ नग जेटिंग मशिन रुपये ४९,०००/- प्रथम वर्ष, रुपये ५०,०००/- द्वितीय वर्ष व रुपये ५१,०००/- तृतीय वर्ष प्रती मशिन प्रती महिना या दराने ३६ महिने एकूण रक्कम रुपये ९०,००,०००/- पर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(तां)/व्हे.डेपो/३८० दि. ३१/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७२४**

पुणे सोलापूर रस्त्याने डाव्या बाजूस पुणे पेठ वानवडी स.नं. ४०, ४१ येथील एस.आर.पी.एफ.कॅम्पसच्या बांधकामामध्ये येणारी बेकर्स हिल टाकी ते हडपसर प्रिस्टेस्ड नलिका रस्त्याच्या कडेने हटविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार श्री.एस.बी.माने यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १४,४९,९१९/- पेक्षा ०१.७०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,२५,२७०=३८ पर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/३८२ दि. ३१/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७२५**

कोंढवा बु. येथे डी.पी.रस्ते व आर.पी.रस्ते विकसित करणे अ) कात्रज कोंढवा रोड ते येवलेवाडी स.नं. ५१ मध्ये जाणारा रस्ता ब) राजीव गांधीनगरकडून साईनगरकडून येणारा कात्रज कोंढवा हद्दीतील डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.बी.के.ओरसे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७४,९८,४६३/- पेक्षा २३% जास्त) (समक्ष चर्चेनुसार) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ९२,२३,१०९=४९ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/३८३ दि. ३१/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७२६**

बिबवेवाडी कोंढवा रस्ता ते शत्रुंजय मंदिराकडे जाणारा रस्ता तयार करणे तसेच गंगा विहार ते गगन विहारकडे जाणारा रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.अश्विन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७४,९९,६७५ पेक्षा २३% जास्त) (समक्ष चर्चेनुसार) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ९२,२४,६००=२५ पर्यंत काम करुन घेण्यास तसेच डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलचे निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/३८४ दि. ३१/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७२७**

प्रभाग क्र. १५ स.नं. १५९ मधून जाणारा ४० फूटी डी.पी.रोड मगरपट्ट्याला जोडणारा कलव्हर्टचे उर्वरित काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.सदगुरु कन्स्ट्रक्शन कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३२,३९,७०४/- पेक्षा ७.७७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३४,९१,४२९/- पर्यंत काम करुन घेण्यास, सिमेंट, स्टील व डांबर यांचे भावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/३८५ दि. ३१/८/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७२८**

वॉर्ड क्र. १०१ पर्वती, जनता वसाहत येथील कॅनॉलला समांतर ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार श्री.रेणुका एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १८,१०,९५९/- पेक्षा २१.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,२६,१३०=२१ पर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(गवनि)/३८८ दि. ३/९/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७२९**

दळवी हॉस्पिटल येथील जुनी इमारत पाडून त्याजागी नविन अद्ययावत इमारत बांधणे भाग-२ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.निर्मिती कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,०७,७४,२०४/- पेक्षा ६.७८६% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १,१५,०५,३४१=४८ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार (पीओएल) प्रमाणे बिल अदा करणेस व काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(भवन)/३९७ दि. ४/९/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७३०**

घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांच्या नावाचे ट्रॅफिक साईनचे बोर्ड पुरविणे व बसविणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.निर्मिती इंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ११,६९,९७०=७५ पेक्षा १७% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,६९,९७०=७५ पर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(वि.क्र.१)/३९८ दि. ४/९/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७३१**

प्रभाग क्र. २३ शाळा क्र. १०७ व ११० गोखलेनगर शाळेच्या पहिल्या मजल्यावरील वर्गखोल्या व स्वच्छतागृहाचे बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.अमर बालाजी कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १८,४८,७५०/- पेक्षा १.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १८,२८,४१३=७५ पर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/३९९ दि. ४/९/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ७३२**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्प झोन क्र. ४, पुणे सोलापूर रस्ता कुमार प्रॉपर्टी येथून ओढ्यातून मांजरी हद्दीतून नदीपर्यंत मुख्य मलवाहिनी टाकणे (टप्पा क्र. १) सन २००७-०८ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडसपैकी ठेकेदार मे.मनोज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,०६९/- पेक्षा २१.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ७८,६९,२६७=३० अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/४०० दि. ४/९/२००७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्रं. ७३३**

टिळक रोड क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील प्रमुख चौकात मास्टीक अस्फाल्ट करणे भाग-२ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.नंदकुमार कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २६,४३,५२५/- पेक्षा ५.२५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २६,४३,५२५/- पर्यंत काम टेंडरमधील डांबर, सिमेंट आणि स्टील या बाबींच्या भाववाढ सूत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पथ/२८६ दि. ३०/७/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/८/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७३४**

पुणे मनपा परिवहन उपक्रमाच्या सेवकांना महागाई भत्ता फरक देणेसाठी रुपये ३ कोटी तसेच इतर तातडीच्या खर्चासाठी र.रुपये २ कोटी असे एकूण र.रुपये ५ कोटी पैकी र.रुपये २ कोटीचे अर्थसहाय्य उचल अथवा अनुदान स्वरुपात देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/२६६ दि. १८/७/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/८/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७३५**

आळंदी रोड पेट्रोलपंप ते म्हस्के वस्ती पर्यंत पाण्याच्या पाईप लाईनसाठी खोदलेल्या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार श्री.उत्तम श्रीरंग गायकवाड यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १५,७२,४४०/- पेक्षा १४.९०% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १८,०६,७३३,५६/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/पापु/प्र/३४८ दि. २३/८/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७३६**

आरोग्य खात्याकडील न्युअसन्स डिटेक्शन विभागाकड़ील न्युअसन्स डिटेक्टर पदाच्या रिक्त जांगावर नेमणूक करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे क्र.अतिमआ(ज)/ एचओ/ २९५, दि.३१/७/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७३७**

पुणे शिक्षण मंडळा समोरील रस्ता अब्दुल मेमन पथ शिवाजीनगर, पुणे.५ हा रस्ता सध्या ३० फूट असून वाढत्या रहदारीमुळे अतिशय अपुरा पडत आहे. तरी रहदारीच्या दृष्टीने सदरचा रस्ता ५० फुटी करण्याबाबतचा झालेला मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१७४, दि.१७/८/२००७ चा विचारा साठी.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ७३८**

महमंदवाडी ते उंड्री मनपा हद्दीबाहेरील रस्त्याचे काम त्वरेने करणेबाबतची निकड लक्षात घेता मा.स्थायी समिती ठ.क्र.३९०, दि.२१/६/२००७ चे पुनर्विचार होणेस मे.राहूल कन्स्ट्रक्शन यांचेकडून टेंडर र.रू.५७,१४,५१३=२४ पर्यंतचे काम तातडीने करून घेणेस व स्टील, सिमेंट व डांबर यांच्या बाजार भावानुसार दरातील फरक ठेकेदारास अदा करणे/कपात करणेस व करार करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) मआ/पथ/३४३, दि.२१/८/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ७३९**

कात्रज स.नं. १४६ येथील तलावाच्या बंधाऱ्यास लोखंडी गेट बसविणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उद्यान/३७८ दि. ३१/८/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७४०**

कर्ज रक्कम रुपये ३ कोटीचे परत फेडीबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/४०३ दि. ५/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७४१**

मिलेनियम मोबीलिटी प्रा.लि., सफायर पार्क गॅलरिया ४, पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, पुणे ५ यांचे आयातकराचे चालू खाते (करंट अकौंट) सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/४०५ दि. ५/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७४२**

एशियन पेन्टस लि., केअर ऑफ चमाडिया सन्स, सर्व्हे नं. २०/२/अे खराडी मुंढवा ब्रिजजवळ, पुणे १४ यांचे आयातकराचे चालू खाते (करंट अकौंट) सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/४०६ दि. ५/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७४३**

सी क्युर बिल्डींग प्रॉडक्टस प्रा.लि., स्वस्ती अर्पाटमेंट, रोड नं. ६, प्लॉट नं. ३, कल्याणीनगर, पुणे ६ यांचे आयातकराचे चालू खाते (करंट अकौंट) सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/४०७ दि. ५/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७४४**

मिलेनियम मोटार्स प्रा.लि., सफायर पार्क गॅलरिया ४, पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, पुणे ५ यांचे आयातकराचे चालू खाते (करंट अकौंट) सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/४०८ दि. ५/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७४५**

पाषाणकर अॅटो प्रा.लि., ३६४, ३६५/२ शिवाजीनगर, जे.एम.रोडजवळ, पुणे ५ यांचे आयातकराचे चालू खाते (करंट अकौंट) सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/४०९ दि. ५/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७४६**

गणेश उत्सवात दि. २२ सप्टेंबर २००७ ते २४ सप्टेंबर २००७ या कालावधीत शनिवारवाडा पटांगण व शहरातील इतर ठिकाणी पुणे महानगरपालिकेतर्फे पुणेकर नागरिकांसाठी सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याने सदर महोत्सवाचे आयोजनाबाबत खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ३५४९ दि. ४/९/२००७ चे पत्र.

१) पुणे मनपातर्फे शनिवार वाडा व शहरातील इतर ठिकाणी दि. २२ सप्टेंबर २००७ ते २४ सप्टेंबर २००७ या कालावधीत सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यास

२) सदर महोत्सवाअंतर्गत नाटक, संगीत इत्यादी कार्यक्रमाचा मुशाहिरा देण्याकरिता अंदाजे र.रुपये २५,००,०००/- (रुपये पंचवीस लाख फक्त) पर्यंत खर्च करण्यास व त्यासाठी खात्यामार्फत आवश्यक ती कोटेशन मागविण्यास

३) या महोत्सवासाठी आवश्यक त्याठिकाणी स्टेज, मांडव, विद्युत व्यवस्था, प्रसिध्दी याबाबतची व्यवस्था व त्याची बिले संबंधित खात्यामार्फत अदा करण्यास

४) सदर कार्यक्रमांतर्गत आयोजित करावयाचे कार्यक्रम निश्चित करण्याचे अधिकार मा.महापौरांना देण्यास

५) या कार्यक्रमासाठी इव्हेन्ट मॅनेजर म्हणून संबंधित अनुभवी व्यक्तीस जबाबदारी सोपविण्यास व त्यांचा मुशाहिरा निश्चित करुन त्यांना तो देण्याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यास

६) सदरील खर्च संबंधित बजेट हेडवर खर्ची टाकण्यास

**विषय क्र. ७४७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २८/४/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २५/८/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१७६ दि. ७/९/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक २८

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. २७/९/२००७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७७९**

मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. १४/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ९८ सॅलसबरी पार्क येथील आनंद सोसायटी शेजारील वृंदावन सोसायटीलगतचा रस्ता डांबरीकरण करणेकरीता र.रुपये ५,००,०००/- चे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-११, शहरात विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे व भुमिगत केबल टाकणे, पान क्र. ३०३, अ.क्र. १४०, वॉर्ड क्र. ९८ आनंदपार्क रस्त्यावरचे दिवे प्रकाशित करणे व विद्युत व्यवस्था करुन केबल अंडरग्राऊंड करणे (मान्य तरतुद र.रुपये ८ लाख) | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ९८ सॅलसबरी पार्क येथील आनंद सोसायटी शेजारील वृंदावन सोसायटीलगतचा रस्ता डांबरीकरण करणे | --- | ५ लाख |

**विषय क्र. ७८०**

मा.पृथ्वीराज सुतार व मा.मुरलीधर मोहोळ यांचे दि. १४/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ६४ मध्ये विविध ठिकाणी ब्लॉक व कॉंक्रीटींग करणेकरीता र.रुपये ४ लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १४६, अ.क्र. ४६, शहरात विविध ठिकाणी नविन रस्ते करणे/रस्ता डांबरीकरण करणे, (यादी क्र. एस-१०), पान क्र. २८८, अ.क्र. १४८, वॉर्ड क्र. ६४ लोढा पेट्रोल पंपासमोरील रस्ता साईड पट्टीसह करणे | ४ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ६४ मध्ये विविध ठिकाणी ब्लॉक बसविणे व कॉंक्रीटींग करणे | --- | ४ लाख |

**विषय क्र. ७८१**

मा.दिलिप उंबरकर व मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. १८/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ५९ मध्ये स.नं. १११, ११२ येथे पाण्याची लाईन टाकणे व टाकी बांधणे तसेच सुतारदरा येथे पाण्याची व्यवस्था करणेसाठी र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-८, शहरात विविध ठिकाणी गल्लीबोळ सिमेंट कॉंक्रीट करणे, पान क्र. २८३, अ.क्र. १२, वॉर्ड क्र. ५९ किष्किंधानगर येथील गल्लीबोळ कॉंक्रीटीकरण करणे व इंटरलॉकींग ब्लॉक करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| स.नं. १११, ११२ येथे पाण्याची लाईन टाकणे व टाकी बांधणे तसेच सुतारदरा येथे पाण्याची व्यवस्था करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. ७८२**

मा.शिवराम मेंगडे व मा.मुरलीधर मोहोळ यांचे दि. १८/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११२ मध्ये स.नं. १४ कर्वेनगर येथे खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या जागेवर बॅडमिंटन हॉल बांधणेसाठी र.रुपये २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, ५.लोकारोग्य, पान क्र. १४०, अ.क्र. ९५, शहरातील स्मशानभूमीत गरम पाण्यासाठी सोलर सिस्टीम सुरु करणे (एकूण तरतूद रुपये १ कोटी) | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ११२ मध्ये स.नं. १४ कर्वेनगर येथे खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेल्या जागेवर बॅडमिंटन हॉल बांधणे | --- | २५ लाख |

**विषय क्र. ७८३**

मा.सागर माळकर व मा.अशोक येनपुरे यांचे दि. १९/९/२००७ चे पत्र.

विश्रांतवाडी येथील अनेक भाजी विक्रेते व फळ विक्रेते हे अनेक वर्षापासून रस्त्याच्या बाजूला विक्री करत असतात. सध्या सी.सी.रोडचे काम चालू असल्याने त्यांना पर्यायी जागा देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांचे भविष्य अधांतरी आहे. विश्रांतवाडी चौक समोरील एअर फोर्सकडे जाणाऱ्या टी जंक्शन याठिकाणी अंडरग्राऊंड सब-वे शॉपिंग सेंटर केल्यास रस्त्यावरील भाजी व फळ विक्रेते यांची सोय होईल. तरी या कामाकरीता सन २००८-०९ च्या अदांजपत्रकात प्राधान्याने तरतूद करण्यात यावी.

**विषय क्र. ७८४**

मा.सागर माळकर व मा.अशोक येनपुरे यांचे दि. १९/९/२००७ चे पत्र.

पुणे ही क्रिडानगरी म्हणून सर्वत्र परिचित आहे. पुणे शहरातील अनेक होतकरु खेळाडू आर्थिक स्थिती कमजोर असल्याने उंच भरारी घेऊ शकत नाहीत. तथापि राज्य-राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर हे खेळाडू चमकण्यासाठी सन २००८-०९ च्या अदांजपत्रकात आर्थिक तरतूद करण्यात यावी.

**विषय क्र. ७८५**

मा.अक्रुर कुदळे(पाटील) व मा.शांतीलाल मिसाळ यांचे दि. १९/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२९ मधील सिंहगड कॉलेज ते धायरी कांबळे वस्तीपर्यंत १८ इंची पाण्याची लाईन टाकणेकरीता र.रुपये ८० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. एस-१३, शहरातील नागझरी नाले सुधारण्यासाठी, पान क्र. ८४, अ.क्र. ५०, | | |
| १) वॉर्ड क्र. १२९ परिसरातील नाला चॅनेलायझेशन करणे व मुख्य रस्त्यावर स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे | २० लाख | --- |
| मलनि:सारण प्रकल्प टप्पा क्र. १, पान क्र. ६९, अ.क्र. २०, | | |
| २) वडगांव धायरी स.नं. २२, २३, २४, २५, २६ व बारंगणीमळा परिसरात मलवाहिनी टाकणे | ३० लाख | --- |
| ३) पान क्र. ६९, अ.क्र. २६, धायरी नाल्यामध्ये मुख्य मलवाहिनी टाकणे व पठारावर मलवाहिनी टाकणे | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १२९ मधील सिंहगड कॉलेज ते धायरी कांबळे वस्तीपर्यंत १८ इंची पाण्याची लाईन टाकणे | --- | ८० लाख |

**विषय क्र. ७८६**

मा.सौ.अलका खाडे यांचे दि. २०/९/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४ कळस विश्रांतवाडी येथील माळवाडी, बापूजी बुवा मंदिर व माळवाडी रामगडशेजारी भूमिगत गटार लाईन टाकणेकरीता र.रुपये १० लाखाचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
| --- | --- | --- |
| सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. डी-१ बी, २-गटारे व नाले, २-मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड, मुख्य मलनि:सारण नलिका मलनि:सारणसंबंधी कामे करणे, (अ) शहराच्या मध्यवर्ती भागासाठी, (ब) शहराच्या इतर भागासाठी, पान क्र. ५३, अ.क्र. ४८, वॉर्ड क्र. ४ कळस विश्रांतवाडी येथील बापूजी बुवा मंदिर ते माळवाडी ओढ्यापर्यंत २ फूटी १५०० रनिंग फुट भुमिगत गटार लाईन टाकणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ४ कळस विश्रांतवाडी येथील माळवाडी, बापूजी बुवा मंदिर व माळवाडी रामगडशेजारी भूमिगत गटार लाईन टाकणे | --- | १० लाख |

याबाबत यापूर्वी झालेला स्थायी समिती ठराव क्र. ७५६ दि. १८/९/२००७ निरस्त करण्यात यावा.

**विषय क्र. ७८७**

मा.अभिजित शिवरकर, मा.शैलेंद्र नलावडे व मा.किरण बारटक्के यांचे दि. २१/९/२००७ चे पत्र.

मौजे वानवडी, पुणे येथील सर्व्हे नं. १५/४ च्या पूर्वेस ४० फुटी डी.पी.रस्ता उत्तर-दक्षिण दिशेने आखण्यात आलेला असून सदर रस्त्याचा बराचसा भाग पूर्ण करण्यात आलेला आहे.

स.नं. १५ मधील डी.पी.रस्त्याचा काही भाग अपूर्ण असल्याने जागा संपादन करुन सदर आखलेला ४० फुटी डी.पी.रस्ता पूर्ण करण्यात यावा.

**विषय क्र. ७८८**

मा.अभिजित शिवरकर, मा.शैलेंद्र नलावडे व मा.किरण बारटक्के यांचे दि. २१/९/२००७ चे पत्र.

मौजे वानवडी, पुणे येथील सर्व्हे नं. ६ मध्ये उत्तर-दक्षिण असा ४० फुटी डी.पी.रोड असून सदर डी.पी.रोडच्या उत्तर व दक्षिण बाजूने डांबरीकरण करण्यात आलेले असून मध्य भागाचे डांबरीकरण झालेले नाही.

सदरहू डी.पी.रस्त्याच्या मध्यभागाची जागा ताब्यात घेऊन डांबरीकरण पूर्ण करण्यात यावे.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ७८९**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १२/५/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ८/९/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/१८५ दि. १९/९/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. ७९०**

दि. ३/९/२००७ ते दि. ९/९/२००७ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १५ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/४५७ दि. २०/९/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. ७९१**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. ३८३९ दि. १९/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७९२**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/१८३ दि. १९/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७९३**

मुख्य लेखापरिक्षक कार्यालयाकडील सेवकांची रजा मान्य करणेबाबत मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांचे क्र. मुलेप/१८४ दि. १९/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७९४**

बांधकाम नियंत्रण, घरपाडी विभागाकडील बिगारी श्री.सागर शरद लडकत यांच्या निलंबन काळाची दि. १९/४/२००७ रोजी पूर्ण झालेली दुसरी सहामाही सेवानियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहआ/से/४४० दि. १७/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७९५**

बांधकाम नियंत्रण, घरपाडी विभागाकडील कनिष्ठ अभियंता श्री.मधुसूदन श्रीरंग येनकर यांच्या निलंबन काळाची दि. २७/८/२००७ रोजी पूर्ण झालेली पहिली सहामाही सेवानियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहआ/से/४४१ दि. १७/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७९६**

श्रीमती संध्या दुला गागरे, हुद्दा क्षेत्रिय अधिकारी, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय यांना दि. २०/४/२००६ पासून मनपा सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांचे निलंबनास दि. १९/१०/२००६ रोजी पहिली सहामाही व दि. १९/४/२००७ रोजी दुसरी सहामाही पूर्ण होत असल्याने सदरची बाब मनपा सेवानियम ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/४५१ दि. १९/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ७९७**

मनपाच्या विविध विभागाकडे कनिष्ठ अभियंता(विद्युत) या पदावर नव्याने ६ महिने मुदतीकरीता करार पध्दतीने केलेल्या खालील उमेदवारांच्या नेमणूकांस मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/४५२ दि. १९/९/२००७ चे पत्र.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|
| १) | श्री.सातपुते महेश शिवराम |
| २) | श्रीमती जाधव पल्लवी सुहास |
| ३) | श्रीमती घाडगे भाग्यश्री महादेव |
| ४) | श्री.अडसूळ जयदिप सुरेश |
| ५) | श्री.केदारी अशोक पुनाजी |
| ६) | श्री.मेढेकर पृथ्वीराज अशोकराव |

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्रं. ७९८**

पुणे मनपाच्या वर्ग ३ मधील सेवकांना संगणक कर्ज रुपये २५ हजार देणेबाबत मा.बापूसाहेब पठारे व मा.राजा बलकवडे यांचे दि. ८/८/२००६ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ६६३ दि. १७/८/२००६ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/मुले/४४६ दि. १८/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ७९९**

गुलटेकडी स.नं. ६९९ येथील वाहनतळ श्री.सैपन लालसाहब पितळे यांना चालविणेस देणेबाबत मा.श्रीकांत पुजारी व मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि. ३०/५/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्रं. ३१७ दि. ६/६/२००७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी पत्र क्रं. मआ/उआ(भूसं)/४४९ दि. १९/९/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेची टेंडर्स

**विषय क्रं. ८००**

११, २२ केव्ही एचटी व ४४० व्होल्टचे फिडर पिलर व बसबार पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.सक्सेस इंजिनिअर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९१,५०,०००/-) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ९१,५०,०००=०० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/४५३ दि. २०/९/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ८०१**

सहकारनगर उपासनी बंगला ते संतनगर उर्वरित नाला चॅनेलायझेशन करणे व तद्.कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार मे.त्रिमुर्ती एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,८२१/- पेक्षा २३.५६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १५,२८,६६३=१७ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/विअ/ड्रेनेज/४५४ दि. २०/९/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ८०२**

एल.टी.केबल पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.के.के.पॉवर कन्ट्रोल वायर्स प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९३,९७,२४०/-) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ९३,९७,२४०/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/४५५ दि. २०/९/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ८०३**

पुणे महानगरपालिकेच्या वाहनांना लागणारे मोटार सारथी सेवक आवश्यकतेनुसार ठेका पध्दतीने घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.जयभवानी एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून प्रती सेवक प्रती १० तास रु. २७०/- या दराप्रमाणे र.रुपये ७५,००,०००/- पर्यंत घेणेपोटी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(तां)/४५६ दि. २०/९/२००७ चे पत्र.

## सर्वात जास्त रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ८०४**

**म.फुले मंडई शुक्रवार पेठ घरांक १ व २ दाते बोळ येथील मिनी मार्केट बोळ १७ ओट्यांचे मिनी मार्केट मक्ता पध्दतीने चालविण्यास देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या २ निविदांपैकी सागर मत्स्य व्यवसाय असोसिएशन यांची निविदा सर्वात जास्त रक्कमेची असल्याने खालीलप्रमाणे मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उआ(गवनि)/मंडई/४४२ दि. १७/९/२००७ चे पत्र.**

**१) म.फुले मंडई शुक्रवार पेठ, दाते बोळ येथील मार्केट सर्वात जास्त निविदा रक्कम देणारे मक्तेदार सागर मत्स्य व्यवसाय असोसिएशन यांची रक्कम रुपये ५१,०००/- प्रती वर्षी या दराची निविदा मान्य करुन त्यांना चालविण्यास देणेस**

**२) सदरचा मक्ता त्यांना प्रथम दोन वर्षे मुदतीकरीता देण्यास व प्रतिवर्षी १२% वाढ याप्रमाणे मक्त्याच्या रकमेत वाढ करुन त्यांचेकडून रक्कम स्विकारण्यास तसेच सदरचे मार्केट चालविण्यास देण्यापूर्वी त्यांचेकडून दोन वर्षाच्या मक्त्याची होणारी निविदा रक्कम एकरक्कमी भरुन घेण्यास**

**३) सदर मक्तेदाराचे काम समाधानकारक आढळल्यास मागील वर्षाचे मक्त्याचे रक्कमेत १२% वाढ करुन तिसऱ्या वर्षाकरीता मक्ता देण्यास**

**४) मक्तेदाराचे काम समाधानकारक नसल्यास मुदत संपण्यापुर्वी सदर मार्केटचा ताबा घेण्यास**

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ८०५**

पुणे शहराच्या परिसरातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एम.एस.आर.डी.सी.) ने केलेल्या कामाच्या रकमेची थकबाकी देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/वानि/१८८ दि. १६/६/२००७ चे पत्र.

१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एम.एस.आर.डी.सी.) केलेल्या पुणे परिसरातील एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प कामाअंतर्गत प्रतिवर्षी टोल नाक्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाऐवजी प्रतिवर्षी पुणे मनपाने र.रु. १० कोटी इतकी रक्कम तूर्त वर्गीकरण करुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास (एम.एस.आर.डी.सी.) देणेस

२) पुणे मनपास अंदाजपत्रकात एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प कामासाठी तरतूद उपलब्ध करणेस

३) अंदाजपत्रकात तरतूद नसल्याने याबाबतचे वर्गीकरणाचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना देणेस.

(सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २१/८/२००७ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ८०६

पुणे शहर व परिसर व तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका व परिसर यांच्या सभोवताली आखण्यात आलेल्या ९० मी.रुंद रस्त्यापैकी पुणे महानगरपालिका व लगतच्या परिसरातील रस्त्याअंतर्गत जागेचे भूसंपादन पुणे महानगरपालिकेच्या खर्चाने सुरु करण्यास स्थायी समितीमार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/२६१ दि. १७/७/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २१/८/२००७ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. ८०७**

पुणे महानगरपालिका कामगार युनियनच्या सरचिटणीस श्रीमती मुक्ता मनोहर यांनी मे.अतुल पेठे यांचे प्रस्तावाप्रमाणे पुणे मनपाचे कचरा डेपो, सफाईच्या हद्दी, क्षेत्रिय कार्यालयामध्ये करण्यात येणारे सफाई व कचरा वर्गीकरणाचे काम त्या अनुषंगाने अन्य कार्यपध्दतीचे चित्रिकरण करुन त्याची ध्वनी चित्रफित केली आहे. या चित्रिकरणाद्वारे सेवक, नागरिक यांमध्ये प्रबोधन तसेच लोकसहभागात होणारी वाढ या बाबी विचारात घेवून घेण्यात आलेला निर्णय योग्य असल्याने सदर चित्रिकरणासाठी संघटनेच्या मागणीप्रमाणे अनुदान म्हणून रक्कम रुपये २,२५,०००/- (र.रुपये दोन लाख पंचवीस हजार फक्त) संकल्प स्वच्छता मोहिमेअंतर्गत वसूल करण्यात येणाऱ्या प्रशासकीय शुल्क निधीतून संघटनेस अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/आरोग्य/४५० दि. १९/९/२००७ चे पत्र.

**विषय क्र. ८०८**

पुणे शहरात पाण्याचे योग्य वितरण, JNNURM योजनेअंतर्गत मीटरायझेशन करणे व दि. १२/३/२००७ रोजी मा.पालकमंत्री, पुणे जिल्हा यांचेबरोबर झालेल्या बैठकीत समाविष्ट गावांसाठी पाणीपुरवठा योजना तयार करणे या सर्व कामांसाठी तज्ञ सल्लागार Unity Consultants Pvt. Ltd. (श्री.महेश पाठक) यांना सल्लागार पॅनेलमध्ये समाविष्ट करुन, त्यांचेकडून वर उल्लेख केलेली कामे करुन घेण्यास व पाणीपुरवठाविषयी वेळोवेळी सल्ला घेण्यास व त्यांनी केलेल्या मागणीनुसार कामाच्या पूर्वगणित रकमेच्या २.३५% + प्रचलित धोरणानुसार मोबदला देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/पापु/४५८ दि. २०/९/२००७ चे पत्र.

**शरद समेळ**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**